विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०१४ च्या कामासाठी नियुक्त केलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पारिश्रमिक/ मानधन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक: निभत्ता-०४१४/ प्र.क्र.६५/विशा-१अ

दुसरा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- शासन निर्णय क्र.निभत्ता ०४१४ / प्र.क्र.६५/ विशा१, दिनांक २१.०३.२०१७.

प्रस्तावना:

महाराष्ट्र राज्यात दि. १५ ऑक्टोबर, २०१४ रोजी एकाच टप्प्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुका शांततेत पार पडलेल्या आहेत. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची अधिसूचना जारी झाल्यापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये, पूर्ण वेळ प्रत्यक्ष निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निवडणुकीची संवेदनशील, जिकीरीचे आणि दगदगीचे काम अत्यंत परिश्रमपूर्वक व जबाबदारीने पार पाडवे लागले. यास्तव, विधानसभा निवडणुका-२०१४ साठी पूर्ण वेळ प्रत्यक्ष निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पारिश्रमिक / मानधन समक्रमांकाच्या दिनांक २१.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आले.

तथापि, सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अखत्यारीतील पोलीस आयुक्त, औरंगाबाद व पोलीस अधिक्षक, धुळे यांच्या व्यतिरीक्त उर्वरीत जिल्ह्यांनी त्यांना अनुदान उपलब्ध न झाल्यामुळे निवडणूक भत्त्याची रक्कम पारीत केलेली नाही. तसेच पोलीस आयुक्त, पुणे, नागपूर व पोलीस अधिक्षक, बुलढाणा व गोंदिया या घटकांचे प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास उशिराने प्राप्त झाल्यामुळे तसेच, काही अधिकारी / कर्मचारी यांची नावे नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या अखत्यारीतील १५ घटक कार्यालयांपैकी १४ कार्यालयांनी संबंधितांना रक्कम अदा केली आहे व पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभागाचे एक देयक आक्षेपांसह परत आल्यामुळे सदर देयकाच्या रकमेचे प्रदान अद्याप प्रलंबित आहे. सबब, सदर प्रलंबित मानधन / पारिश्रमिक देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णयः-

महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुका-२०१४ ची अधिसूचना जारी झाल्यापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये पूर्ण वेळ प्रत्यक्ष निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर पडलेला निवडणुकीच्या कामाचा ताण, कामाची व्याप्ती व कामाचे दिवस इत्यादी बाबी विचारात घेवून सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" व "ब" मधील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना, त्यांच्या माहे ऑक्टोबर २०१४ या महिन्यातील ६ व्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय मूळ वेतन (Basic Pay) + ग्रेड वेतन (Grade Pay) एवढे पारिश्रमिक / मानधन म्हणून देण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे. परंतु, ज्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी एक महिन्यापेक्षा म्हणजे ३० दिवसापेक्षा कमी दिवस निवडणुकीचे काम केले असेल त्यांना, जेवढे दिवस त्यांनी काम केले असेल तेवढ्या दिवसाचे पारिश्रमिक / मानधन देय होईल. ज्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी एक महिन्यापेक्षा म्हणजे ३० दिवसापेक्षा जास्त दिवस निवडणुकीचे काम केले असेल त्यांना कमाल एक महिन्याचे वेतन (मूळ वेतन + ग्रेड वेतन) देय होईल. अशी रक्कम कोणत्याही पोलीस अधिका-यांस / कर्मचा-यास त्यांच्या १ महिन्याच्या वेतनापेक्षा (मूळ वेतन + ग्रेड वेतन) जास्त असणार नाही. तसेच, विधानसभा सार्वत्रिक निवडणुका- २०१४ साठी सदर मानधन हे एका अधिका-यास / कर्मचा-यास एकदाच देय होईल.

२. शासन निर्णय क्र.निभत्ता ०४१४ / प्र.क्र.६५/ विशा १ अ, दिनांक २१.०३.२०१७ मधील परिशिष्ट "अ" व "ब" मध्ये नमूद केलेल्या कार्यालय अधिक्षक, प्रशासकिय अधिकारी, प्रमुख लिपिक, वरिष्ठ श्रेणी लिपिक, कनिष्ठ श्रेणी लिपिक या पदांवर कार्यरत असलेले कर्मचारी हे पोलीस संवर्गातील असतील तरच त्यांना सदर पारिश्रमिक / मानधन देण्यात यावे. सदर पारिश्रमिक / मानधन हे फक्त पोलीस संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

३. पोलीस महासंचालक यांच्या अखत्यारीतील घटक कार्यालयातील सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मधील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पारिश्रमिक/मानधन यावर होणारा खर्च, "मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) (०१) जिल्हा पोलीस बल, दत्तमत (२०५५ ०१६८), (०१) वेतन" या लेखाशीर्षाखाली सन २०१७ - १८ या वित्तीय वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

४. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अखत्यारीतील घटक कार्यालयातील सोबत जोडलेल्या **परिशिष्ट- ब** मधील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पारिश्रमिक / मानधन यावर होणारा खर्च, मागणी क्र. "बी-१, २०५५ पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२) (०१) शहर पोलीस - आस्थापना, दत्तमत (२०५५ ००९७) (०१) वेतन" या लेखाशीर्षाखाली सन २०१७ - १८ या वित्तीय वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौचारीक संदर्भ क्र. २७४/१७/व्यय-७, दिनांक २८.०९.२०१७ अन्वये त्या विभागांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११६१५०२४५६०२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay D Patil
Date: 2017.11.16 15:05:35 +05'30'

(विजय पाटील)
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. महाराष्ट्रातील सर्व मा. संसद सदस्य.
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा / विधान परिषद.
६. सर्व मा. विधानसभा सदस्य / मा. विधान परिषद सदस्य.
७. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
११. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
१४. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग यांचे स्वीय सहायक.
१५. सर्व पोलीस आयुक्त.
१६. सर्व पोलीस अधीक्षक.
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / बांद्रा.
१८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२०. वित्त विभाग, कार्यासन सेवा-९ / व्यय-४, मंत्रालय, मुंबई.
२१. सामान्य प्रशासन विभाग, का. क्र. ३३, मंत्रालय, मुंबई.१७)
२२. निवडनस्ती (कार्यासन विशा-१अ).

<u>परिशिष्ट -अ</u>

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अखत्यारील घटक कार्यालयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या पारिश्रमिक/मानधनाचे विवरणपत्र.

हुद्दा	एकूण अधिकारी	मूळ वेतन (रक्कम रु.मध्ये)	ग्रेड वेतन (रक्कम रु.मध्ये)	एकूण (रक्कम रु.मध्ये)
<u>पोलीस अधिकारी</u> (A)				
पोलीस महासंचालक	१	८०,०००/-	०	८०,०००/-
अपर पोलीस महासंचालक	६	४,६२,६४०/-	०	४,६२,६४०/-
विशेष पोलिस महासंचालक	७	३,७५,४९०/-	६८,९००/-	४,४४,३९०/-
पोलीस उप महानिरीक्षक	८	३,५८,३१०/-	७१,२००/-	४,२९,५१०/-
पोलीस अधिक्षक / पोलिस उप आयुक्त	६५	१६,६५,१२०/-	४,३६,७००/-	२१,०१,८२०/-
अपर पोलीस अधिक्षक	२७	६,१६,५८०/-	१,७८,२००/-	७,९४,७८०/-
सहायक पोलीस आयुक्त/ पोलिस उप अधिक्षक	२४०	५१,३७,०५१/-	१३,०१,४००/-	६४,३८,४५१/-
एकूण पोलीस अधिकारी (A)	**३५४**	**८६,९५,१९१**	**२०,५६,४००**	**१,०७,५१,५९१**
<u>पोलीस अधिकारी</u> (B)				
पोलीस निरीक्षक	६७८	१,३६,११,०२६/-	३२,५६,२००/-	१,६८,६७,२२६/-
सहायक पोलीस निरीक्षक	४८९	७२,८६,४११/-	२१,५१,५००/-	९४,३७,९११/-
पोलिस उप निरीक्षक	४१९	५२,४३,४१०/-	१७,८४,५००/-	७०,२७,९१०/-
एकूण पोलीस अधिकारी(B)	**१५८६**	**२,६१,४०,८४७/-**	**७१,९२,२००/-**	**३,३३,३३,०४७/-**
<u>पोलीस कर्मचारी(C)</u>				
सहायक पोलीस उप निरीक्षक	५००	६३,२५,९१९/-	१३,४९,६००/-	७६,७५,५१९/-
पोलिस हवालदार	११२७	१,२२,११,९९३/-	२५,३२,०००/-	१,४७,४३,९९३/-
पोलीस नाईक	१३८८	१,३०,९७,६२६/-	२९,८०,८००/-	१,६०,७८,४२६/-
पोलिस शिपाई	१०७०	८०,५०,६८३/-	१९,३४,०००/-	९९,८४,६८३/-
एकूण (कर्मचारी)	**४०८५**	**३,९६,८६,२२१/-**	**८७,९६,४००/-,**	**४,८४,८२,६२१/-**
एकूण (पोलीस अधिकारी + कर्मचारी)(A+B+C)	**६०२५**	**७,४५,२२,२५९/-**	**१,८०,४५,०००/-**	**९,२५,६७,२५९/-**

<u>परिशिष्ट -ब</u>

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अखत्यारील घटक कार्यालयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या पारिश्रमिक/ मानधनाचे विवरणपत्र.

हुद्दा	एकूण अधिकारी	मूळ वेतन (रक्कम रु.मध्ये)	ग्रेड वेतन (रक्कम रु.मध्ये)	एकूण (रक्कम रु.मध्ये)
<u>**पोलीस अधिकारी**</u>				
पोलीस उप आयुक्त	१	२९,११०/-	६,६००/-	३५,७१०/-
पोलीस निरीक्षक	६	१,३१,८३०/-	३०,०००/-	१,६१,८३०/-
सहायक पोलीस निरीक्षक	६	८२,९२०/-	२६,४००/-	१,०९,३२०/-
पोलीस उप निरीक्षक	७	७६,११०/-	३०,१००/-	१,०६,२१०/-
एकूण (पोलीस अधिकारी)	**२०**	**३,१९,९७०/-**	**९३,१००/-**	**४,१३,०७०/-**
<u>**पोलीस कर्मचारी**</u>				
सहायक पोलीस उप निरीक्षक	२	२७,०९०/-	५,६००/-	३२,६९०/-
पोलीस हवालदार	१	१२,१९०/-	२,४००/-	१४,५९०/-
पोलीस नाईक	२	२१,०९०/-	४,८००/-	२५,८९०/-
पोलीस शिपाई	२९	२,५४,३४०/-	६०,८००/-	३,१५,१४०/-
एकूण (कर्मचारी)	**३४**	**३,१४,७१०/-**	**७३,६००/-**	**३,८८,३१०/-**
एकूण (पोलीस अधिकारी + कर्मचारी)	**५४**	**६,३४,६८०/-**	**१,६६,७००/-**	**८,०१,३८०/-**